# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)
शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
पत्र पेटी क्र.- ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


महत्वाचे परिपत्रक

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१७/3008
दिनांक 13 OCT 2017

प्रति,
उपसचिव, तंत्रशिक्षण मंडळ प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय / शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय,औरंगाबाद
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन,औरंगाबाद, जालना,अंबड,जिंतूर,हिंगोली,नांदेड,उस्मानाबाद, बीड
पु.ला.शा.तं.लातूर,.म.तं.नि.लातूर

**विषयः-** तांत्रिक कर्मचा-यांच्या पदनामाबाबत

**संदर्भः-** उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. पदनामे-२००९/(१०९/०९) तांशि-२, दि.२७.०९.२०१७

उपरोक्त शासन निर्णयानुसार तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या शासकीय/अनुदानित/स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतने तसेच तत्सम संस्था आणि तंत्रशास्त्र विद्यापिठातील कर्मशाळा व प्रयोगशाळेतील कर्मचा-यांच्या पदनामात बदल झालेला शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सबब तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/अनुदानित/स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतने तसेच तत्सम संस्था आणि तंत्रशास्त्र विद्यापिठातील कर्मशाळा व प्रयोगशाळेतील कर्मचा-यांच्या पदनामाबाबत शासन निर्णयची प्रत सोबत जोडली आहे. सदर शासन निर्णयाचे अवलोकन करुन त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी.

सोबतः-शासन निर्णय

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहितीस्तव तसेच सदरचे पत्र या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

Forwding Letter all instt. 2014/kakade/

**तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकिय / अनुदानित / स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतने तसेच तत्सम संस्था आणि तंत्रशास्त्र विद्यापिठातील कर्मशाळा व प्रयोगशाळेतील कर्मचा-यांच्या पदनामाबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पदनामे-२००९/(१०९/०९)/तांशि-२,**
मंत्रालय, विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २७ सप्टेंबर, २०१७

<u>संदर्भ</u> :- पदनामे-२०१२/(४५/१२)/तांशि-२ दिनांक १ जून, २०१२

<u>प्रस्तावना</u> -

महाराष्ट्रातील तंत्र शिक्षण विभागाच्या विभाजनानंतर तंत्रशिक्षण विभागाचे तंत्रशिक्षण संचालनालय व व्यवसाय प्रशिक्षण असे दोन भाग निर्माण होऊन त्यांची स्वतंत्र कार्यप्रणाली अस्तित्वात आली.

तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत असलेल्या शासकिय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालये व तत्सम संस्थांत असलेल्या सर्व तांत्रिक सहाय्यकारी पदांची पदनामे सन १९६४ पासून अस्तित्वात असून यात काही सुधारणा झालेली नाही. सदरची काही पदे कालबाह्य स्वरूपाची झाली आहेत.

तांत्रिक सहाय्यकारी पदांना विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके पुर्ण करण्यास मार्गदर्शन करणे, विद्यार्थ्यांकडुन प्रात्यक्षिके पुर्ण करून घेणे, प्रात्यक्षिकांचा अहवाल वरिष्ठांना सादर करणे या स्वरूपाची कामे नेमलेली आहेत. सदरच्या पदांचे जातीवाचक नाम बदलून त्यांना निदेशक पदनाम व त्या अनुषंगाने सुधारित सेवाप्रवेश नियम व वेतनश्रेणी मिळणेबाबत शासकिय तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी तांत्रिक कर्मचारी संघटना ब-याच वर्षापासून मागणी करीत आहे. त्यांच्या कडून तसेच लोकप्रतिनिधींकडून या बाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे.

शासकिय /अशासकिय अनुदानित/स्वायत्त/ अभियांत्रिकी महाविद्यालये, तंत्रनिकेतने, तत्सम संस्था व तंत्रशास्त्र विद्यापिठातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचा-यांची पदे ही अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या निकषानुसार भरण्याचे निर्देश आहेत. तांत्रिक कर्मचा-यांची काही पदनामे ही पुर्वापार इंग्रजांच्या काळापासूनच जातीवाचक स्वरूपाची आहेत. बदलत्या काळात शिक्षणाचे महत्व, त्याचा प्रसार तसेच केंद्र शासनाच्या विविध योजनेतील कौशल्य विकासा अंतर्गत तंत्रशिक्षणाचे प्रशिक्षण देऊन बेरोजगारांना उद्योगधंदे सुरु करण्यासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य तंत्रशिक्षण विभागामार्फत करण्यात येते.

कार्यशाळेतील कार्यरत तांत्रिक कर्मचा-यांनी ।T। निदेशकानुसार वेतनश्रेणी मिळणेबाबत तसेच संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक १ जून २०१२ च्या विरूध्द व इतर बाबींच्या अनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई येथे मुळ अर्ज क्रमांक १४०/२०१२ दाखल केला होता. सदर प्रकरणी मा.महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयात असे नमूद केले आहे

की, अर्जदारांना नियोक्त्याने सांगितल्याप्रमाणे कर्तव्य बजावण्यामध्ये कोणतेही आक्षेप असण्याचे कारण असू नये. दिनांक ०१/०६/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्धारित करण्यात आलेले कर्तव्ये व जबाबदा-या शिक्षकीय स्वरूपाच्या म्हणता येणार नाही. सदरचा शासन निर्णय असंविधानिक म्हणता येणार नाही. तसेच तो अहेतूक किंवा पक्षपाती नाही. त्यामुळे अर्जदारांचे या शासन निर्णयाच्या वैधतेस आव्हान देणे फोल ठरते. तसेच अर्जदाराची निदेशक म्हणून नामनिर्देशित करण्याची मागणी निराधार असल्याचे मा. न्यायाधिकरणाने नमूद केले आहे व अर्जदारांच्या मागण्या अमान्य करून सदरचा मूळ अर्ज निकाली काढला आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अभियांत्रिकी महाविद्यालय व तंत्रनिकेतनातील कार्यदेशक व प्रभारक ही पदे पदोन्नती साखळीतील असलेली उच्च पदे, त्यांची एकत्रित सेवाजेष्ठता, तसेच पदनाम बदलाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही व या अनुषंगाने शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार येणार नाही / पडणार नाही या अटीस अधीन राहून पदनामात बदल करण्याबाबतची संचालनालयाची शिफारस, त्याच प्रमाणे या प्रकरणी शासकिय तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालय तांत्रिक कर्मचारी या संघटनेची ब-याच वर्षापासूनची असलेली मागणी व प्रकरणी मा. लोकप्रतिनिधींनी सातत्याने केलेला पाठपुरावा, मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (उ. व तं.शि.), मा.मंत्री (वित्त) महोदयांकडे आयोजित केलेल्या बैठका, इत्यादी बाबी विचारात घेऊन व शासनावर कोणताही अधिकचा अर्थिक भार येणार नाही या अटीस अधीन राहून पदनामात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील तांत्रिक कर्मचा-यांची पदनामे सुतार, लोहार, गवंडी, नळ पत्रे कारागीर, मोटर मॅकेनिक, सहा. इंजिन चालक, इंजिन सहायक, कुशल कारगीर, विजतंत्री / विद्युत मिस्त्री, रेडीओ मेकॅनिक, भट्टीचालक, संग्राहालय सहायक, कातारी, संधाता, जोडारी, यंत्र कारागीर, उपकरण यांत्रिकी, बंधकार, साचेकार, अभिरक्षक, सर्वसाधारण यांत्रिकी, रासायनिक सहायक, शिल्प निदेशक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, सर्वे उपकरण यांत्रिकी, मोटार निदेशक, मशीन ऑपरेटर, आरेखक, विद्युत उपकरण यांत्रिकी, स्वयंचालित यांत्रिकी, भूमापन उपकरण अभिरक्षक, उपकरण अभिरक्षक, शितवातानुकुलीत यांत्रिकी, तारतंत्री तथा प्रयोगशाळा सहायक, मुद्रण निदेशक, ए. व्ही. एडस टेक्नीशीयन, प्रयोगशाळा सहायक (तांत्रिक) सहायक, तांत्रिक प्रयोगशाळा सहायक इत्यादी या पदांची वेतनश्रेणी रू. ५२००-२०२०० व ग्रेड पे रू. २४००/- अशी एकच आहे, सदर कर्मचा-यांच्या एकत्रित सेवाजेष्ठतेबाबत मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक १०४३/२००५ मध्ये दि. २३/०७/२०१५ रोजी मा. न्यायाधिकरणाने पारित केलेल्या न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतनातील कर्मशाळा व प्रयोगशाळेत कार्यरत तांत्रिक कर्मचा-यांची एकत्रित सेवाजेष्ठता सूची करण्याबाबत करण्याचे आदेश आहेत. सदरच्या पदांचे सुधारीत सेवाप्रवेश नियम तयार करण्याची कार्यवाही प्रस्ताविण्यात येत आहे. सदर पदांच्या कर्तव्ये व जबाबदा-या शासन निर्णय दिनांक ०१/०६/२०१२ नुसार निश्चित केल्या असून त्याही समान आहेत. सदरच्या बाबी विचारात घेऊन सुधारीत पदनामाच्या अनुषंगाने वरीष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय राहणार नाही, तसेच या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही व शासनावर कोणत्याही प्रकारचा अर्थिक भार येणार नाही / पडणार नाही. तसेच

सदर पदनामात बदल केल्याने इतर विभागातील समान पदनाम असणा-या पदाची वेतनश्रेणी देय असणार नाही, सदर पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या मुळ वेतनश्रेणीत / वेतनसंरचनेत कोणताही बदल होणार नाही. इतर विभागात कार्यरत असणा-या याच पदनामांच्या वेतनश्रेणीत फरक असल्यास त्याप्रमाणे वेतन सुधारणेची मागणी अनुज्ञेय असणार नाही, सदरची पदनाम बदलानंतरही सदर पदनामांच्या कर्तव्ये व जबाबदा-यांमध्ये बदल होणार नाही. सातवा वेतन आयोग लागु करण्याबाबतची कार्यवाही सुरु असल्याने पदनाम बदलाच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या वेतनश्रेणींशी समानता दर्शवून त्यानुसार वेतन संरचना मागता येणार नाही. सुधारित पदानामांची यादी परिशिष्ट-अ सोबत जोडली आहे.

सदरचे आदेश हे वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक सेवा-९/२४/४/२०१७ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१७०९२७१६३४३००१०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(प्रकाश भास्करराव आव्हाड)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत :**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

३. मा. विरोधी पक्षनेता विधानपरिषद, विधानसभा.

४. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) / मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

५. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, (संचालनालयामार्फत)

७. कुलसचिव, डॉ.बाबासाहेब तंत्रशास्त्र विद्यापिठ, लोणेरे.

८. सर्व संस्थांचे प्रमुख (संचालनालयामार्फत)

९. अवर सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई-३२

१०. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई ३२

११. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१२. निवड नस्ती-तांशि-२.

## शासन निर्णय क्रमांकः पदनामे-२००९/(१०९/०९)/तांशि-२, दिनांक २७ सप्टेंबर,२०१७ सोबतचे परिशिष्ट -अ

| अ.क्र. | सद्या कार्यरत असलेले तांत्रिक कर्मचारी व पदनामे | सुधारीत पदनामे |
|---|---|---|
| १ | जोडारी | निदेशक (जोडरी) |
| २ | सुतार | निदेशोक(सुतार) |
| ३ | कातारी | निदेशक (कातारी) |
| ४ | संधाता | निदेशक (संधाता) |
| ५ | लोहार | निदेशक (लोहार) |
| ६ | गवंडी | निदेशक (गवंडी ) |
| ७ | नळ / पत्रे कारागीर | निदेशक (नळ / पत्रे कारागीर) |
| ८ | यांत्रिकी / यंत्रकारागीर | निदेशक (यांत्रिकी / यंत्रकारागीर) |
| ९ | उपकरण यांत्रिकी | निदेशक (उपकरण यांत्रिकी) |
| १० | बंधकार | निदेशक (बंधकार) |
| ११ | साचेकार | निदेशक (साचेकार) |
| १२ | विजतंत्री / विद्युत मिस्त्री | निदेशक (विजतंत्री) |
| १३ | अभिरक्षक | निदेशक (अभिरक्षक) |
| १४ | आरेखक | निदेशक (आरेखक) |
| १५ | सर्वसाधारण यांत्रिकी | निदेशक (सर्वसाधारण यांत्रिकी) |
| १६ | रेडिओ मेकॅनिक | निदेशक(रेडिओ मेकॅनिक) |
| १७ | शिल्प निदेशक (चर्मकला) | निदेशक (शिल्प निदेशक चर्मकला) |
| १८ | कुशल कारागीर | निदेशक (कुशल कारागीर) |
| १९ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | निदेशक (प्रयोगशाळा तंत्रज्ञ) |
| २० | सर्व्हे उपकरण यांत्रिकी | निदेशक (सर्व्हे उपकरण यांत्रिकी) |
| २१ | स्वयंचलित यांत्रिकी | निदेशक (स्वयंचलित यांत्रिकी) |
| २२ | इंजिन सहाय्यक | निदेशक (इंजिन सहाय्यक) |
| २३ | भट्टी चालक | निदेशक (भट्टी चालक) |
| २४ | भूमापन उपकरण अभिरक्षक | निदेशक (भूमापन उपकरण अभिरक्षक) |
| २५ | उपकरण अभिरक्षक | निदेशक (उपकरण अभिरक्षक) |
| २६ | सहायक इंजिन चालक | निदेशक (सहायक इंजिन चालक) |
| २७ | संग्रहालय सहाय्यक | निदेशक (संग्रहालय सहाय्यक) |
| २८ | प्रशितन व वातानुकूलित यांत्रिकी | निदेशक (प्रशितन व वातानुकूलित यांत्रिकी) |
| २९ | तारतंत्री तथा प्रयोगशाळा सहाय्यक | निदेशक (तारतंत्री तथा प्रयोगशाळा सहाय्यक) |
| ३० | ए. व्ही. एडस टेक्नीशीयन | निदेशक (ए. व्ही. एडस टेक्नीशीयन) |
| ३१ | प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) | निदेशक [प्रयोगशाळा सहाय्यक ( तांत्रिक)] |
| ३२ | गॅस विज संधाता | निदेशक (गॅस विज संधाता) |
| ३३ | विजतंत्री यंत्रतंत्री | निदेशक (विजतंत्री यंत्रतंत्री) |

| | | |
|---|---|---|
| ३४ | विद्युत मिस्त्री | निदेशक ( विद्युत मिस्त्री ) |
| ३५ | कनिष्ठ विजतंत्री | निदेशक (कनिष्ठ विजतंत्री) |
| ३६ | विद्युत मिस्त्री / विज मिस्त्री | निदेशक (विद्युत मिस्त्री / विज मिस्त्री) |
| ३७ | विद्युत उपकरण यांत्रिकी | निदेशक (विद्युत उपकरण यांत्रिकी) |
| ३८ | वायरमन | निदेशक (वायरमन) |
| ३९ | अभिरक्षक भुमापन (भुशास्त्र) | निदेशक (अभिरक्षक भुमापन भुशास्त्र) |
| ४० | अभिरक्षक भुमापक | निदेशक (अभिरक्षक भुमापक) |
| ४१ | मोटार मॅकॅनिक | निदेशक (मोटार मॅकॅनिक) |
| ४२ | मोटार निदेशक | निदेशक (मोटार निदेशक) |
| ४३ | यंत्र चालक | निदेशक (यंत्र चालक) |
| ४४ | मशीन मॅकॅनिक | निदेशक (मशीन मॅकॅनिक) |
| ४५ | इंजिन परिचर | निदेशक (इंजिन परिचर) |
| ४६ | ऑटो मॅकॅनिक | निदेशक (ऑटो मॅकॅनिक) |
| ४७ | यांत्रिकी आरेखक | निदेशक (यांत्रिकी आरेखक) |
| ४८ | तंत्रसहायक धातुशास्त्र | निदेशक (तंत्रसहायक धातुशास्त्र) |
| ४९ | निदेशक | निदेशक (निदेशक) |
| ५० | जनरल मॅकॅनिक | निदेशक (सर्वसाधारण यांत्रिकी) |
| ५१ | Fotger And Heat tratement (लोहार) | निदेशक (लोहार) |
| ५२ | Foundry men (साचेकार) | निदेशक (साचेकार) |
| ५३ | कार्यदेशक (चर्मकला) | निदेशक { कार्यदेशक (चर्मकला) } |
| ५४ | यंत्र सहायक (मुद्रण) | निदेशक { यंत्र सहायक (मुद्रण) } |
| ५५ | सर्वेक्षण उपकरण अभिरक्षक | निदेशक { सर्वेक्षण उपकरण अभिरक्षक } |

**(प्रकाश भास्करराव आव्हाड)**

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.